# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
## महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१.

WWW.DVET.GOV.IN e-mail: dk12_dvet@YAHOO.COM Fax- 22659235/22675628 Phone No. 22620604/293.


क्र.१२/एएफएन/२००९/(१५)/२२७
दिनांक :- ३०/०३/२००९

प्रति,
अध्यक्ष / प्राचार्य,
श्री. परशराम बाळाजी पाटील, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र,
मुदाळ, ता. भुदरगड, जिल्हा कोल्हापूर

**विषय :- विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांमध्ये नवीन व्यवसाय / जादा तुकड्यांना परवानगी देणेबाबत...**

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यांत येते की, शासन निर्णय क्र.आयटीआय २००९/(६०/०९)/व्यशि-२, दि. २ मार्च ,२००९ अन्वये खालील नवीन व्यवसाय / तुकड्या सुरु करण्यांस अटींच्या अधीन राहून परवानगीं दिलेली आहे.

१) मंजूर केलेल्या नवीन व्यवसाय / जादा तुकड्यांसाठी संस्थेने आवश्यक त्या बाबींचे केंद्र शासनाच्या ट्रेनिंग म्यॅन्युअल मधील मानकानुसार १००% पूर्तता करुन दि.०५ मे,२००९ ते २० मे,२००९ या कालावधीत संस्थेचे स्थायी समितीतर्फे / स्थानिक स्थायी समितीतर्फे (DIR) निरीक्षण करण्यांत येईल. तत्पूर्वी ३० एप्रिल,२००९ पर्यंत नवीन व्यवसायासाठी पूर्व निरीक्षण अहवाल सहसचांलक / उपसंचालक, प्रादेशिक कार्यालयाकडे सादर करण्यांत यावा. तद्नंतर स्थायी समितीचे निरीक्षण लावण्यांत येईल.

२) संलग्नता प्राप्त झाल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत संस्थेस नव्याने परवानगी मिळालेल्या नवीन व्यवसाय / जादा तुकड्यात प्रवेश करु नयेत.

३) संस्थेचे स्थायी समिती निरिक्षण / स्थानिक स्थायी समिती निरिक्षणापूर्वी शासन निर्णय क्र. पीटीआय-१०००/२४६/व्यशि-१, दि.१५ एप्रिल,२००२ अन्वये दिलेल्या आदेशानुसार प्रति व्यवसाय प्रति तुकडी रु.१०,०००/- (रुपये दहा हजार मात्र) एवढी अनामत रक्कम संचालक,(प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,मुंबई-४०० ००१ यांचे नांवे धनाकर्ष संचालनालयास जमा केल्यानंतरच तसेच संलग्नता प्राप्त झाल्यावर प्रत्यक्ष प्रवेशास संचालनालयाकडून स्वतंत्र परवानगी देण्यांत येईल तद्पूर्वी प्रवेश देण्यांत येऊ नयेत.

४) डि.जी.ई.टी.,नवी दिल्ली यांच्या सूचनेप्रमाणे संलग्नता प्राप्त नसतांना विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नयेत असे प्रवेश दिल्यास प्रवेशित विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परीषदेच्या परिक्षेस बसण्यांची परवानगी देण्यांत येणार नाही. व परिक्षा घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील याची संस्थेने नोंद घ्यावी.

५) या व्यतिरिक्त शासनाकडून / व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचेकडून वेळोवेळी निर्गमित करण्यांत आलेल्या शासन निर्णयाचे / आदेशांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) शासनाने / संचालनालयाचे वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे संस्थेने पालन करणे आवश्यक असून प्रवेश, निरीक्षण,संलग्नता,प्रशिक्षण इ. बाबत कोणत्याही स्वरुपाची अनियमितता आढळल्यास संस्थेस दिलेल्या नवीन व्यवसाय / जादा तुकडीची परवागनी रद्द करण्यांत येईल.

७) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व राज्य शासनाने / संचालनालयाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे/ निदेशांचे पालन न केल्यास किंवा प्रवेश / संलग्नता / परीक्षा इ. बाबत कोणत्याही स्वरुपाची अनियमितता केल्यास संस्थेस दिलेल्या नवीन व्यवसाय / जादा तुकड्यांची परवानगी तात्काळ रद्द करण्यांत येईल.

...२/-